मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 1 सप्टेंबर 2024 | पान- 1

# छत्रपती संभाजी महाराज पुतळा उभारणीत सर्वपक्षीय समिती गठित करा!

## महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची मागणी : पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने मोशी या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यापूर्वीच साशंकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. येथील पुतळ्याच्या काही भागाला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुतळा उभारण्यापूर्वी सल्लागार नेमण्यात येऊन त्यावरही कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले आहे. त्यामुळे आता या छत्रपती संभाजी महाराज पुतळा उभारणी सर्वपक्षीय समिती गठीत करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.



पिंपरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, नेते अजित गव्हाणे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुलभा उबाळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम,माजी नगरसेवक रवी लांडगे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, विनायक रणसुभे आदी उपस्थित होते.

बोऱ्हाडेवाडी विनायकनगर येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभा करण्याचे निश्चित करण्यात आल्यानंतर सदर निवडलेली जागा चुकीची आहे. सदर जागेवर जाण्याकरीता रस्ता अरुंद आहे. पार्किंगची सुविधा पुरेशी उपलब्ध होऊ शकत नाही. पुतळ्याशेजारी टोलेजंग इमारती आहेत. त्यामुळे पुतळ्याच्या सौंदर्याला बाधा पोचू शकते तसेच पुतळ्याला यामुळे अडसर निर्माण होईल. त्याचप्रमाणे सदर निवडलेली जागा मुख्य रस्त्यापासून आत आहे. अशा मुख्य बाबी सामाजिक संघटना, नागरिक, इतिहास प्रेमी तसेच राजकीय पक्षांनी निदर्शनास आणून देत सदर ठिकाणी पुतळा उभा करण्यासाठी विरोध केला होता. मात्र राजकीय श्रेयवाद लाटण्यासाठी आणि स्टंटबाजीमध्ये त्याच जागेवर पुतळा उभा करण्याचे काम रेटून नेण्यात आले आणि चौथऱ्याचे काम देखील सुरू करण्यात आले.

सुरवातीला विनायकनगर या जागेवर चौथरा उभारण्याचे काम मे. धनेश्वर कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला दि. 16 मार्च 2020 ला 12.50 कोटी रुपयाला देण्यात आले. सदर कामाची मुदत ही १८ महिने होती. वेळेत काम झाले नाही म्हणून पुन्हा 31 डिसेंबर 2022 पर्यंत मुरत वाढ देण्यात झाली. आजपर्यंत 40%, काम पुर्ण झाले त्याचे 5.50 कोटी रुपये बिल ठेकेदाराला अदा झाले आहे. त्यांनतर जागेमध्ये बदल करण्याचे ठरले. मग झालेल्या 5.50 कोटी रूपये खर्च याला जबाबदार कोण रहा प्रश्न उभा राहिलेला असतानाच दुसरा पुतळा उभारण्याचा घाट म्हणजे थोडक्यात झालेल्या चुकांवर पांघरून घालण्याचा प्रयत्न आहे. आता नव्याने होणाऱ्या खर्चाचा आकडा मात्र गुलदस्त्यात ठेवण्याचा खटाटोप सुरू आहे.

नवीन जागी पुतळा उभारण्यासाठी जागेची मागणी पीएमआरडीएकडे करण्यात आली. पीएमआरडीए हा शासनाचाच भाग असताना सुद्धा सदर जागेसाठी त्यांनी 49 कोटी 74 हजार 272 रुपयांची मागणी केली आहे. सदर जागा आज ताब्यात दिलेली असली तरी भविष्यात या जागे पोटी एक रुपयाही देण्यात येऊ नये अशी आमची आग्रही मागणी आहे. पुणे आंतरराष्ट्रीय केंद्राच्या जागेमध्ये पुतळा उभारण्याची परवानगी मिळाल्यानंतर या जागेत चौथरा उभा करण्यासाठी पुन्हा पंधरा कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली. यासाठी ठेकेदाराशी संगणमत करण्यात आले. नियम व अटी शर्ती लागू करताना ठेकेदार डोळ्यासमोर ठेवण्यात आला. त्यामुळे नवीन जागेवर पुतळा उभारताना पुन्हा धनेश्वर कन्स्ट्रक्शन याच ठेकेदाराला चौथरा बांधण्याचे काम देण्यात आले. छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभा करणाऱ्या राम सुतार या दिल्ली येथील शिल्पकाराला 32 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. आजपर्यंत या ठेकेदाराला महापालिकेतून 22 कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत.

# निगडीतील महाराणा प्रताप पुतळ्याचा भाला चोरीला

## निगडी प्राधिकरण परिसरातील पुतळा परिसरामध्ये सुरक्षारक्षक नेमावा,अशी मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडीमधील वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचे स्मारक आहे. पुतळ्याला असणारे महाराणा प्रताप यांचे अस्त्र भाला हे काही अज्ञात व्यक्तींनी चोरून नेले. हा झालेला प्रकार खूप निंदनीय असल्याने राजपूत समाजाच्या वतीने महाराणा स्मारक येथे संघटनेच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. तसेच महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या दालनाबाहेर मूक आंदोलन करण्यात आले.



**तातडीने बसवला भाला..**

» वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा भाला चोरीस गेला होता. तो लगेच नव्याने महापालिकेच्या वतीने बसवण्यात आला. त्याचप्रमाणे उद्यानातील किरकोळ दुरुस्तीचे कामसुद्धा केले जाईल, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

यावेळी राजपूत संघटनेचे अध्यक्ष शिवकुमार बायस, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, सचिन काळभोर, श्रीराम परदेशी, नेताजी सिंह राजपूत, अशोक इंगळे, गणेश राजपूत, राजेंद्र सिंह राठौड, प्रवीण राजपूत, चतुर्भुज चव्हाण, माउली जगताप आदी उपस्थित होते.

निगडी प्राधिकरण परिसरातील पुतळा परिसरामध्ये सुरक्षारक्षक नेमावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

# नव्याने मतदार डाटा तयार करण्यात यावा : ॲड. संदीप चिंचवडे

## मतदार संघात वाढलेला मतदार दुबार, बोगस, मयत अशाप्रकारचा आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात ६ लाख ४३ हजार ७६९ मतदार असलेली अंतिम मतदार यादी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांच्या हस्ते नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मतदार संघात वाढलेला मतदार दुबार, बोगस, मयत अशाप्रकारचा आहे. त्यामुळे चिंचवड विधानसभेचे फेर सर्वेक्षण करून नव्याने मतदार डाटा तयार करण्यात यावा अशी मागणी माजी नगरसेवक ॲड. संदीप चिंचवडे यांनी केली आहे.



ॲड. संदीप चिंचवडे यांनी यासंदर्भात निवडणूक आयोग, जिल्हा निवडणूक विभागाला निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार जिल्ह्याची अंतिम मतदार यादी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आली. या यादीनुसार चिंचवड विधानसभा मतदार संघात ५६१ मतदान केंद्र, ३ लाख ३९ हजार ७२७ पुरुष, ३ लाख ३ हजार ९८९ महिला आणि तृतीयपंथीय ५३ असे ६ लाख ४३ हजार ७६९ मतदार असल्याचे जाहीर केले आहे.

परंतु चिंचवड मतदार संघातील वाढलेला मतदार दुबार, बोगस, मयत अशा प्रकारचा आहे. यात अनेक वर्षे कसल्याही सुधारणा होताना दिसत नाही. आज सुद्धा ५० हजार पेक्षा जास्त मतदार चिंचवड विधानसभेच्या बाहेरचे आहेत, ते या विधानसभेचे भविष्य ठरवतात. त्यामुळे चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे फेर सर्वेक्षण करून नव्याने मतदार डाटा तयार करण्यात यावा. युद्ध पातळीवर आणि अचूक असा डाटा फोन नंबर सहित तयार करायला हवा. प्रभावी योजना आणि योग्य अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी ॲड.संदीप चिंचवडे यांनी केली आहे.

# मालवणच्या घटनेनंतर महापालिकेचे प्रशासन सतर्क

## महापालिका प्रशासनाकडून शहरातील 50 हून अधिक पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर महापालिकेचे प्रशासन सतर्क झाले असून शहरातील ५० हून अधिक पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे.

नौदल दिनानिमित्त आठ महिन्यांपूर्वी राजकोट किल्ल्यावरील बसवलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ४ दिवसांपूर्वी कोसळला. या घटनेनंतर राज्यात संतापाची लाट उसळली आहे. यावरून राजकारण चांगलेच तापले आहे. राज्यात ठिकठिकाणी आंदोलने, निदर्शने सुरू आहेत. या सर्व प्रकारामुळे महापालिका प्रशासनाने सावध भूमिका घेत शहरातील ५० हून अधिक पुतळ्यांचे ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे.

शहरातील अनेक मुख्य भागात राज्यातील महापुरुषांचे पुतळे बसविण्यात आले आहेत. एकदा पुतळे बसविण्यात आल्यानंतर त्याकडे प्रशासनाचे लक्ष जात नाही. केवळ जयंती आणि पुण्यतिथीला पुतळ्याची स्वच्छता केली जाते. त्यानंतर मात्र वर्षभर पुतळ्यांकडे पाहिलेदेखील जात नाही. त्यामुळे शहरातील अनेक पुतळे धुळखात पडून आहेत.

उभारण्यात आलेल्या प्रत्येक पुतळ्याशी समाजातील कोणत्या ना कोणत्या धर्माची, व्यक्तीची समुदायाची, संघटनांची भावना जोडली आहे. त्यामुळे पुतळा ही खूप संवेदनशील अशी गोष्ट आपल्या समाजात आहे. त्यामुळे पुतळ्याची विटंबना होऊ नये, याची काळजी घेतली जाते. "महापालिका प्रशासनाने पुतळ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतल्याने या निमित्ताने पुतळ्यांकडे लक्ष दिले जाणार आहे. त्यामुळे पुतळा आणि तो उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता होईल," अशी प्रतिक्रिया पुणेकर व्यक्त करीत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मालवण येथे आठ महिन्यांपूर्वी नौदल दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला होता. तेव्हा नौदलाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचं कौतुक करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारला होता. मोदी यांनी ४ डिसेंबर २०२३ रोजी मालवणमध्ये नौदल दिनानिमित्त येऊन शिवरायांच्या पुतळ्याचे लोकार्पण केले होते. दुर्दैवाने महाराजांचा संपूर्ण पुतळा आठ महिन्यात कोसळल्याने शिवप्रेमींतून नाराजी आणि संताप व्यक्त केला जात आहे. यामुळे राज्य सरकारवर टीका केली जात आहे. तसेच विरोधी पक्षाने या विरोधात आंदोलन उभारले आहे. ठिकठिकाणी आंदोलने होत आहेत. त्यामुळे असा प्रकार आता कोणत्याच शहरात घडू नये, महापुरुषांचे उभारण्यात आलेले पुतळे कोसळू नये, यासाठी काळजी घेतली जात आहे. पुणे शहराच्या अनेक मुख्य भागात महापालिका तसेच खासगी संस्था, संघटना आणि राजकीय पक्षांकडून पुतळे बसविण्यात आले आहेत. कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी पुतळ्यांचे ऑडिट करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.



### शिल्पकार जयदीप आपटे आणि सल्लागार डॉ. चेतन पाटील यांच्यावर गुन्हा दाखल

» या प्रकरणी चौकशीचे घोडे दामटणे सुरू आहे. पोलिसांनी शिल्पकार जयदीप आपटे आणि सल्लागार डॉ. चेतन पाटील यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. विरोधकांनी या मुद्यावरून रान पेटवले आहे. त्यावरून मालवणमध्ये राडा, ड्रामा आणि राजकारणाचे इतर सर्व रंग पाहायला मिळाले. या मुद्यावर राजकारण नको, तर निष्पक्ष चौकशी आणि दोषींना शिक्षा व्हावी, अशी जनतेची इच्छा आहे.

### शिवभक्तांच्या भावना दुखावल्या...

» सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अचानक कोसळला. ही घटना दुर्दैवी असून राज्यातील शिवभक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. राज्यातील मराठी माणूस शिवाजी महाराजांना आराध्य दैवत मानते. लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांचीच शिवाजी महाराजांवर श्रद्धा आहे. त्यामुळे राज्यात पुतळा कोसळणे ही मनाला वेदना घटना असून ती सहन होत नसल्याचे राज्यातील जनतेचे म्हणणे आहे. त्यामुळे सर्वच स्तरातून सरकार विरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्येही याप्रकरणी अनेक आंदोलने झाली.

> शहरातील ५० हून अधिक पुतळ्यांचे ऑडिटसाठी स्ट्रक्चरल कन्सल्टन्ट नेमण्यात येणार आहे. त्यांच्या माध्यमातून पुतळ्यांच्या स्थितीची माहिती घेतली जाणार आहे. त्याचा अहवाल तयार केला जाणार आहे. त्यानंतर त्यावर उपाययोजना केल्या जातील.
>
> - युवराज देशमुख, उपायुक्त, पुणे महापालिका.

# राजकारणात 40 वर्षे झालीत, मला अडाणी समजू नका; हर्षवर्धन पाटील यांचा खणखणीत इशारा

## अजित पवार यांनी अगोदरच इंदापूर मतदार संघावर दावा सांगितला आहे, तर आता हर्षवर्धन पाटील पण आक्रमक झाले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीपूर्वीच महायुतीत जागा वाटपावरून महाभारत सुरु असल्याचे चित्र आहे. त्यात इंदापूर मतदारसंघावरून मोठा खल सुरु आहे. अजित पवार यांनी जनसन्मान यात्रेतून मोठी ताकद दाखवली. इंदापूर गुलाबी झाले. आमदार दत्ता भारणे पण गुलाबी रंगात न्हाऊन निघाले. त्यामुळे दादांचा गट या मतदारसंघात सक्रिय झाल्याचे चित्र आहे. तर हर्षवर्धन पाटील यांनी सुद्धा आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. आतापर्यंत वेट अँड वॉचच्या भूमिकेत असलेले हर्षवर्धन पाटील यांनी मनातील खदखद व्यक्त केली. राजकारणात 40 वर्षे झालीत, मला अडाणी समजू नका, असा खणखणीत इशाराच त्यांनी नेतृत्वाला दिला आहे.

आपल्या सगळ्यांचा पाठबळ बघितल्यानंतर 2024 च्या विधानसभेत परिवर्तन होईल. महाराष्ट्रात नेमकी काय परिस्थिती आहे मला माहित नाही. इंदापूर च्या विधानसभेच्या निवडणुकीची चर्चा ही तालुक्यापूर्ती मर्यादित राहिली नाही. राजकीय वातावरणावर महाराष्ट्रात चर्चा आहे. इंदापूर तालुक्यात बदल होणार आहे, हे नागरिकांनी ठरवलं आहे, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.

उद्याची निवडणूक लढवायची की नाही हा प्रश्न आहे. उद्याच्या आमदारकीच्या निकालापेक्षा दहा वर्षे काही नसताना सोबत राहिली, ते निष्ठावन्त सोबत आहेत. म्हणून आज वेगळी ताकद निर्माण झाली आहे. आज सगळ्यांचे फोन येत आहेत. याचा अर्थ काय घ्याचा तो घ्या. मी कुणाला होकार दिलेला नाही. जी चर्चा लोकसभेच्या वेळी झाली. देवेंद्र फडणवीस यांच्याशी माझी मैत्री आहे. त्यांना भेटणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



### अपक्ष लढणार का?

» अपक्ष लढायचं या लोकांच्या भावना आहेत. इंदापूर तालुका गेल्या दहा वर्षात विकासापासून 50 वर्ष दूर गेला आहे. काळ बदलला आहे, मतदार खूप हुशार झाला आहे. दोन- चार दिवसात विचार करू. कुणाला भेटायचं?, कुणाला विचारायचं? कुठलीही गोष्ट मी अंधारात करत नाही. इकडे एक आणि तिकडे एक ही गोष्ट करत नाही. एखादी लबाडी एखाद्या निवडणुकीला खपवून जाते. प्रत्येक वेळी नाही. पुढील निर्णय सर्वांना विश्वासात घेतल्याशिवाय घेणार नाही. विधानसभा निवडणुकीला अडीच ते तीन महिन्यांचा काळ आहे. बोलून प्रश्न सुटणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### मला अडाणी समजू नका

» माझ्या बाबतीत उमेदवारी तिकीट हा कायमच वादाचा मुद्दा राहिलेला आहे. जिथं, जिथं योग्य भूमिका घ्यायची गरज आहे, तिथं घेऊ. मला ही राजकारणात 40 वर्ष झाली आहेत. मलाही राज्यातली आराखडे कळतात. मला अडाणी समजू नका, असा टोला पण त्यांनी यावेळी हाणला. त्यांचा हा टोला कुणाला होता, हे वेगळं सांगायची गरज नाही. विस्कटलेली पुन्हा बसवायची आहे. पुढील काळात विस्कटलेली घडी दुरुस्त करायची आहे. थोडा वेळ लागेल, असे ते म्हणाले.

# आगामी गणेशोत्सवासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस सज्ज

## पालिका, पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची पार पडली बैठक : शांतता कमिटी सदस्यांनीही लावली बैठकीस हजेरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी सण, उत्सव शांततेत साजरे होण्यासाठी पोलीस आयुक्तालय स्तरावर लोकप्रतिनिधी आणि मध्यवर्ती शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थितांना आश्वस्त करताना पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आगामी सण उत्सव शांततेत साजरे करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस सज्ज असल्याचे सांगितले.

या बैठकीसाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, आमदार दिलीप मोहिते पाटील, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे व शांतता कमिटी सदस्य उपस्थित होते. शांतता समिती बैठकीमध्ये आमदार अमित गोरखे म्हणाले की, चांगल्या शाळांसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करावे. डीजे आवाजाचा महिलांना जास्त त्रास सहन करावा लागतो.



रूममध्ये गणपती बसवतात त्यावर पोलिसांचे कंट्रोल असले पाहिजे. आमदार उमा खापरे यांनी रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत महिला एकटी असेल तर पोलिसांची मदत घ्यावी. रात्री भगिनींना घरी पोहोचवण्यासाठी मदत घ्यावी, असे पोस्टर लावावेत, अशी सूचना केली. आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी गणपती विसर्जन मिरवणुकीत लोक दारू पिऊन येतात. त्यांच्यावर पोलिसांची निगराणी हवी. प्रशासनाने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करावी. मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये, याची खबरदारी घ्यावी. गणेश विसर्जनासाठी कृत्रीम तलाव तयार करण्याबाबत मुद्दे उपस्थित केले.

### नागरिकांचे सहकार्य अनिवार्य

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे म्हणाले की, मागील काळात सण-उत्सवादरम्यान सर्व पिंपरी-चिंचवडकरांचे सहकार्य मिळाले. तसेच नागरिक शांतता कमिटी सदस्य यांचे बहुमोल सहकार्य लाभले. यापुढेही सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो. आमदार यांनी गणेश उत्सव स्थापना, विसर्जन, वाहतूक नियोजन, गर्दी नियोजनाबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल. नागरिकांनी एक गाव एक गणपती असे उपक्रम राबवावेत. ज्या ठिकाणी मनुष्यबळ कमी आहे तिथे मनुष्यबळ वाढवले आहे. ईद ए मिलाद सणाचे अनुषंगाने चांगले सहकार्य मिळावे तसेच इतर सर्व गोष्टींबाबत काही वाटल्यास माहिती द्यावी, असे त्यांनी सांगितले.

### गैर प्रकारांना घालणार आळा

आगामी गणपती, गणेश विसर्जन अशा आगामी सर्व सणांसाठी पोलिसांच्या बैठका सुरू आहेत. यामध्ये गर्दीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था व मंडळांवर नियंत्रण याचे नियोजन करण्यात येत आहे. याबरोबरच गर्दीच्या काळात सोनसाखळी चोरी, वाहन चोरी किंवा इतर गुन्हे घडू नयेत यासाठी पोलीस यंत्रणा डोळ्यात तेल ओतून काम करणार आहे. नागरिकांनी या काळात कोणताही गैरप्रकार त्यांच्या निदर्शनास आल्यास पोलिसांना कळवावे, असे आवाहन आयुक्तांनी केले.

### गणेशोत्सवात कडेकोट बंदोबस्त

» पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत दीड दिवसांचे तसेच पाच, सात, नऊ आणि दहाव्या दिवशीही गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाते. त्यामुळे शहर व परिसरात उत्सवकाळात विसर्जन मिरवणुका काढण्यात येतात. या मिरवणुका शांततेत पार पाडण्यासाठी मिरवणूक मार्ग व विसर्जन घाटांवर मोठा बंदोबस्त लावण्यात येणार आहे. तसेच नोंदणीकृत मंडळांनाही आवश्यकतेनुसार बंदोबस्तसाठी स्वतंत्र पोलीस अधिकारी व कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत दीड हजार पेक्षा जास्त गणेशोत्सव मंडळांना परवानगी दिली आहे. यात काही मंडळे परवानगी न घेताही गणेशोत्सव साजरा करतात. तसेच काही हाउसिंग सोसायटी, कंपन्या यांच्याकडूनही गणेशोत्सव साजरा केला जातो. हा गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली असल्याचेही आयुक्त चौबे यांनी सांगितले.

# कोकणवासीयांसाठी वल्लभनगर एसटी आगारातून जादा बसची सुविधा

## गणेशोत्सवाकरिता कोकणात गावी जाण्याचे चाकरमान्यांनी नियोजन : 50 बसचे ग्रुप बुकिंग

**पिंपरी | प्रतिनिधी**

येत्या सात सप्टेंबरला गणरायाचे आगमन होत आहे. गणेशोत्सवाकरिता कोकणात गावी जाण्याचे चाकरमान्यांनी नियोजन केले आहे. या सर्व कोकणवासियांसाठी वल्लभनगर एसटी आगाराच्या वतीने जादा बसची सुविधा देण्यात आली आहे. आतापर्यंत ५० बसचे ग्रुप बुकिंग करण्यात आले आहे.

आणखी बुकिंग होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ४ सप्टेंबरपासून या बस रवाना होणार आहेत. दरम्यान, या पूर्वी कोकण प्रवासी संघाने एसटीचे जिल्हा वाहतूक नियंत्रक प्रमोद नेहुल यांच्याशी पत्रव्यवहार केला होता.



गणपती उत्सव म्हणजे कोकणच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. गणपती बाप्पा, कोकणचा चाकरमानी व एसटी यांचे एक अतुट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी धावत असते. वल्लभनगर एसटी आगारातून दर वर्षी कोकणात जाण्यासाठी एसटीची सुविधा असते. ग्रुप बुकिंग करून या बस रवाना होत आहेत.

गेल्या वर्षी ७५ ग्रुप बुकिंगच्या बस धावल्या होत्या. यंदाच्या वर्षीही आगाराच्या वतीने ही सुविधा दिली आहे. यंदाच्या वर्षी ५० बसेसची ग्रुप बुकिंग झाली आहे. चार, पाच आणि सहा सप्टेंबर रोजी या बस कोकणात विविध मार्गावर रवाना होणार आहेत. यामध्ये चिपळूण, रत्नागिरी, खेड, सावंतवाडीसह विविध गावांचा समावेश आहे. दोन हजार २०० प्रवाशांची नोंद आहे.

एसटी आगारात गाड्या कमी पडल्यास बाहेरच्या डेपोतून देखील जादा बसेस मागविण्यात येणार आहेत. तसेच आणखीन पाच एसटी बसेसची ग्रुप बुकिंग होण्याची शक्यता असल्याचे आगाराच्या वतीने सांगण्यात आले.

> “ वल्लभनगर एसटी आगारातून जादा बसची सुविधा देण्यात आली आहे. सध्या ५० गाड्या बुक झाल्या आहेत. मागणीनुसार आणखी गाड्यांची सोय केली जाणार आहे. चार, पाच आणि सहा सप्टेंबर रोजी या बस कोकणात धावणार आहेत.
> - संजय वाळवे, आगारप्रमुख, पिंपरी-चिंचवड आगार.

# राष्ट्रपतींच्या प्रवासाच्या मार्गावरील खड्डे बुजवले

## महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांचा दावा : व्हीव्हीआयपी नेत्यांच्या दौऱ्याची काळजी घेण्यासाठी प्रशासनाची धावाधाव

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा ३ सप्टेंबरला पुण्यात येत आहेत. राष्ट्रपती शहरातील ज्या मार्गाने प्रवास करणार आहेत, त्या रस्त्यांवरील खड्डे बुजवल्याचा दावा महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी केला आहे.

शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची मोहीम वेगाने राबविली जात असल्याने शहरातील कोणत्याही व्हीव्हीआयपी दौऱ्याला त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जात असल्याचेही डॉ. भोसले यांनी नमूद केले.



महापालिकेच्या पथ विभागाने राज्यपाल यांच्या दौऱ्यावेळी त्यानंतर राष्ट्रपती यांचा दौरा शहरात असल्याने गणेशखिंड रस्त्याची दुरुस्ती करून घ्यावी, असे पत्र पीएमआरडीएला दिले होते. मात्र पीएमआरडीएने महापालिकेच्या पत्राला थेट केराची टोपली दाखविण्याचा प्रकार दोन वेळा घडला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने जबाबदारी घेत रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची मोहीम हाती घेतली आहे. तसेच महत्त्वाच्या व्यक्ती येणार असल्याने प्रशासकीय वादापेक्षा कामाला अधिक महत्त्व देण्याला प्राधान्य दिले आहे, असेही आयुक्त भोसले यांनी सांगितले.

पुणे शहरातील रस्त्यांवर पावसाने खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याने वाहनचालक चांगलेच त्रासले आहेत. रस्त्यावर खड्डे असल्याने वाहतूक संथ गतीने सुरू आहे. याचा फटका राष्ट्रपतींच्या दौऱ्याला बसू नये, यासाठी महापालिकेच्या पथ विभागाकडून खड्डे बुजवण्यासाठी धावाधाव सुरू आहे. गणेशखिंड रस्त्यावर पीएमआरडीएकडून हिंजवडी ते शिवाजीनगर या दरम्यानच्या मेट्रोचे काम चालू आहे. या कामासाठी गणेशखिंड रस्त्यावरील विद्यापीठ चौकातील दुहेरी उड्डाणपूल पाडण्यात आला आहे. या चौकात मेट्रो, ग्रेडसेपरेटर व उड्डाणपूल असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

सध्या गणेशखिंड रस्त्यावर मेट्रो व विद्यापीठ चौकात दुहेरी उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी पीएमआरडीए आणि मेट्रो प्रकल्पाचे काम करणाऱ्या कंपनीची आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून ते बुजवण्याची जबाबदारी ही पीएमआरडीएची असून तत्काळ खड्डे बुजवण्याची सूचना महापालिकेच्या पथ विभागाने केली होती. मात्र, या पत्राला पीएमआरडीएने केराची टोपली दाखविली होती.

### खर्च कोण करणार, हे अद्याप अस्पष्ट

**» पीएमएआरडीए महापालिकेला कोणत्याही प्रकारे सहकार्य करत नसल्याची तक्रार महापालिकेकडून अनेकदा केली जाते. त्यामुळे पालिकेच्या पथ विभागानेच स्वत:हून गणेशखिंड रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या कामाचा खर्च कोण करणार हे मात्र, अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही. तसेच इतर ठिकाणी महामेट्रोच्या कामामुळे रस्त्यांची वाट लागली आहे. पावसाळी लाईन तुंबल्या आहेत. त्या दुरुस्त करण्यासाठी महापालिका प्रशासनाने पीएमआरडीएला पत्रव्यवहार केला. मात्र, कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने स्वत: महापालिकेने काम सुरू केले आहे.**

> गणेशखिंड रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम मेट्रोकडे हस्तांतर करत असलो तरी सगळे खड्डे आम्ही बुजवत आहोत. खड्डे प्रश्न मोठ्या प्रमाणात झाला आहे. गेल्या आठ दिवसात दोन हजार ३०० खड्डे बुजवले आहेत. २७ ऑगस्टपासून पुन्हा दोन हजार खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले आहे. ज्या ठिकाणी राष्ट्रपतींचा कार्यक्रम आहे, त्या रस्त्यावरील खड्डे बुजवले आहेत. गणेशोत्सवामध्येसुद्धा मोहीम सुरूच राहणार आहे. प्रमुख १४ रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले आहे. ज्या ठिकाणी पाणी तुंबते, त्यावरही काम सुरू आहे. वाहतूक कोंडी कमी व्हावी, यासाठीसुद्धा प्रयत्न सुरू आहेत.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

# पुणे-सोलापूर महामार्गावरील रखडलेले काम बेततंय प्रवाशांच्या जीवावर

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांचे कमालीचे दुर्लक्ष : हडपसर लक्ष्मी कॉलनी ते शेवाळेवाडी फाटा महामार्गाची वाट ‘बिकटच’

**पुणे | प्रतिनिधी**

हडपसर रवीदर्शन ते द्राक्ष संशोधन केंद्र यादरम्यान पुणे सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम करण्यात येत आहे. हे काम गेले अनेक दिवसापासून अर्धवट स्थितीत बंद आहे. याशिवाय या महामार्गावर लक्ष्मी कॉलनी ते मांजरी उपबाजार दरम्यान गॅस वाहिनी टाकण्यासाठी खोदलेला रस्ता अर्धवट स्थितीत ठेवण्यात आला आहे. खोदलेल्या अर्धवट कामामुळे वाहतूक सुरळीत होत नाही. यामुळे येथे अपघाताची मालिकाच सुरू झाली आहे. स्थानिक नागरिकांसह विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्याकडून येथील स्थितीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाला वारंवार कळवूनही संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जातो आहे.



गेली अनेक महिन्यापूर्वी येथील गॅस वाहिनीचे काम करणाऱ्या ठेकेदाराने व कंपनीने काम झाल्यानंतर खोदलेला रस्ता तसाच अर्धवट स्थितीत सोडून दिला आहे याशिवाय पावसाळा सुरू होण्याच्या तोंडावर येथील रवी दर्शन ते द्राक्ष संशोधन केंद्र दरम्यान सुस्थितीतील रस्त्यावर पुन्हा रस्त्याचे काम हाती घेतलेल्या ठेकेदारांनेही काम अर्धवट स्थितीत ठेवले आहे . केलेले कामही काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे झाले आहे. असा आरोपही अनेकांनी केला आहे. या दोन्ही कामाबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागातील अधिकाऱ्यांना वारंवार कळविले आहे.मात्र, संबंधित अधिकारी ठेकेदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप केला जातो आहे.

लक्ष्मी कॉलनी ते मांजरी उपबाजार दरम्यान अर्धवट कामामुळे वाहतुकीला शिस्त नाही. चौकात नेहमीच वाहतुकीची कोंडी होते. गेल्या महिन्याभरात येथील अर्धवट कामामुळे खडीवरून घसरून तसेच पडलेल्या खड्ड्यात पाण्याचा अंदाज न आल्याने वाहने घसरून अनेकांना गंभीर दुखापतीसह किरकोळ दुखापतीचा सामना करावा लागला आहे . राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच काम करणाऱ्या ठेकेदाराला याचे सोयरसुतक नाही.

> पुणे- सोलापूर महामार्ग रवीदर्शन ते कवडीपाट टोलनाका दरम्यान अतिशय सुस्थितीत होता.तरीही यावर करोडो रुपयांचा निधी टाकून रस्ता केला जात आहे. केलेला रस्ता अतिशय निकृष्ट पद्धतीचा झाला आहे. थोड्या पावसातच रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत .डांबर व खडी निघून गेली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चे अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने यामध्ये लाखोंचा भ्रष्टाचार झाला असावा ,याची चौकशी केली जावी.
>
> **- राहुल शेवाळे, सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी,पुणे.**

> लक्ष्मी कॉलनी ते शेवाळेवाडी दरम्यान सीएनजी पाईपलाईन टाकण्यासाठी खोदलेला महामार्ग पुन्हा दुरुस्ती न करता चांगल्या असलेल्या रस्त्यावरती परत डांबर टाकले. तेही दहा-बारा दिवसात निघून गेले .ज्या बाजूला रस्ता बनवायचा होता तो कितीतरी दिवस झाले तसाच पडलेला आहे. त्यामुळे रोज अपघात होऊन कितीतरी नागरिक जखमी होऊन मृत्युमुखी पडत आहेत . संबंधित अधिकारी व कॉन्ट्रॅक्टर वरती गुन्हा दाखल व्हावा ,अन्यथा शिवसेना स्टाईलने तीव्र जनआंदोलन करण्यात येईल.
>
> **- उल्हास तुपे, जिल्हा प्रमुख, शिवसेना शिंदे गट, पुणे.**